भूजल व्यवस्थापन आणि साठा विषयावर कार्यशाळा, जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यशाळेचे आयोजन >>पान 2

कु. आरती खंडागळे हिची ऑल इंडिया युनिव्हर्सिटी बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड >>पान 3

डोणगावमधील मोकाट कुत्र्यांच्या दहशतीवर अखेर धरपकड कारवाई >>पान 4

दैनिक


# आपला विदर्भ

**सुविचार**

संयमी माणसं धाडसी असतात.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



'नवरी मिळे हिटलर'ला नंतर लीलाची आणखी एक मालिका, वल्लरीला कशी मिळाली भूमिका?

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 155 ■ रविवार, दि. 11 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# पुण्यात मेट्रो मोफत, अजित पवारांची घोषणा

**पुणे/प्रतिनिधी : राज्यातील महापालिका निवडणुकांमध्ये मुंबईनंतर पुणे महापालिकेकडे राज्याचं लक्ष लागलं आहे. कारण, राज्यातील सत्तेत एकत्र असलेल्या भाजप विरुद्ध राष्ट्रवादी यांच्यातच येथे थेट सामना होत आहे. तर, शिवसेना शिंदे गटही येथे भाजपविरुद्ध मैदानात उतरल्याचं दिसून येतं. त्यामुळे, पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेवर सत्ता स्थापन करण्यासाठी राजकीय पक्षांकडून मतदारांना मोठमोठी आश्वासनं दिली जात आहेत. विशेष म्हणजे आजच राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही पक्षांनी संयुक्त जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यामध्ये, महापालिकेवर सत्ता आल्यास पुणेकरांना मेट्रो मोफत करणार अशी भलीमोठी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. त्यामुळे, सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. मात्र, मेट्रो मोफत करण्याचा अधिकार महापालिकेला आहे का, यासह अनेक प्रश्न मतदारांना पडले आहेत**



मेट्रो आणि मोफत बस सेवेचे आश्वासन देण्यात आले आहे. पुण्यातील वाहतूक कोंडी आणि खराब रस्ते यामुळे पुणेकरांचे पेट्रोलच्या स्वरूपात दररोज साडे सात कोटी रुपये वाया जातात. अशाप्रकारे वर्षाला दहा हजार आठशे कोटी रुपये पेट्रोलच्या स्वरूपात वाया जातात. त्यामुळे ते पैसे मेट्रोच्या प्रवासासाठी वापरता येतील, असा मोठा प्लॅन अजित पवारांनी सांगितला आहे. त्यामुळे, पुण्यात मोफत मेट्रो शक्य आहे का? यासह पुणे मेट्रोबाबत विविध प्रश्नांची माहिती खालील लेखातून देण्यात आली आहे.

**पुणे मेट्रो माहिती**

१. पुण्यात मेट्रोचे दोन मार्ग सुरू आहेत. पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट आणि वनाझ ते रामवाडी.

२. पुण्यात मेट्रोचे आणखी ४ ते ५ मार्ग प्रस्तावित आहेत. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचा मार्ग खडकवासला ते खराडी हा आहे. त्याशिवाय सध्याच्या मार्गांचा विस्तार जसे की, पिंपरी ते निगडी, वनाझ ते चांदणी चौक, रामवाडी ते वाघोली आणि स्वारगेट ते कात्रज हे मार्ग प्रस्तावित आहेत.

याशिवाय, एसएनडीटी-वारजे-माणिकबाग आणि हडपसर ते लोणी-काळभोर व हडपसर ते सासवड रोड असे आणखी दोन मार्ग होणार आहेत. या सर्व मार्गांसाठी जवळपास ३० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

३. पुण्यातील मेट्रोची प्रवासी संख्या सध्या साधारणत: दोन ते सव्वादोन लाखांच्या दरम्यान आहे. माण-हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्च २०२६ पर्यत सुरू झाल्यास ही संख्या आणखी वाढेल.

५. प्रवासी तिकीटातून मेट्रोला दर महिन्याला अंदाजे १० ते १२ कोटी रुपये मिळतात. गेल्या वर्षभरात २०२५ मध्ये मेट्रोला तिकीटातून १०५ कोटी रुपये प्राप्त झाले होते.

६. मोफत प्रवासाचा निर्णय पुणे महापालिका घेऊ शकत नाही. घेतला, तरी तो अंतिम मान्यतेसाठी राज्य व केंद्र सरकारकडे पाठवावा लागणार आहे. मेट्रो चालविणाऱ्या महामेट्रोच्या संचालक मंडळात त्यावर अंतिम निर्णय होऊ शकतो. (देशात एकही मेट्रो सेवा मोफत चालवली जात नाही.)

७. गणेशोत्सवामध्ये दिवसाला सहा लाख प्रवाशांनी मेट्रोने प्रवास केला, तर मेट्रोची यंत्रणा काहीशी कमी पडली होती. मोफत प्रवास उपलब्ध करून दिल्यास गर्दी प्रचंड वाढेल, स्वच्छता राखता येणार नाही. मेट्रोकडे वाढत्या गर्दीला सामावून घेण्यासाठी सध्या पुरेशा ट्रेन नाहीत.

पुणे पीएमपी - पुण्यात पीएमपीचे किती मार्ग सुरु आहेत?

- ३८१

पुण्यात सध्या किती प्रवासी प्रवास करतात?

- दररोज - सरासरी- ९,८५,८४९

- मासिक - सरासरी - ३३७३३२००

- वार्षिक - सरासरी - ४१०७८५६००

सध्या सुरु असलेली चालवण्यासाठी किती खर्च आहे?

- महिना - सुमारे १११ ते ११२ कोटी

प्रवाशांच्या तिकीटातून किती पैसे मिळतात?

- दीड ते दोन कोटींच्या घरात

मोफत प्रवास दिल्यास वाढणारी गर्दी सहन होईल का?मेट्रोची यंत्रणा गर्दी कशी हाताळेल?

- पुणे पिंपरी चिंचवड आणि पीएमआरडी एकत्र लोकसंख्या पाहता, सर्वकष वाहतूक आराखड्यानुसार सहा ते सात हजार बस संख्या आवश्यक आहे.

# मतदारांना चक्क मोफत विदेशी दारूचे वाटप

## बाटल्यांच्या बॉक्सने भरलेल्या कारसह तिघे ताब्यात; पिंपरी चिंचवडमध्ये राष्ट्रवादीचा भाजपवर गंभीर आरोप

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरु असून राजकीय वातावरण देखील तापू लागले आहे. अशातच मतदारांना आकर्षित करण्यासाठी पक्ष आणि पक्षातील उमेदवार अनेक आश्वासनं आणि नानाविविध शक्कल लावताना दिसताय. अशीच एक आगळी वेगळी शक्कल लावल्याचे पिंपरी-चिंचवडमधून समोर आले आहे. मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी चक्क परराज्यातील विदेशी दारूच्या बाटल्या मोफत वितरीत केल्याचा प्रकार समोर आला आहे. मतदारांना आपल्या पक्षाकडे आकर्षित करण्यासाठी चक्क परराज्यातील विदेशी दारूच्या बाटल्या मोफत वितरित करण्यात आल्या आहेत. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रभाग क्रमांक २१ मधील पिंपरी गावातील पवनेश्वर मंदिराजवळ हा प्रकार घडलाय. दरम्यान, प्रभाग क्रमांक २१ मधील भाजप उमेदवाराच कार्यकर्त्यांनी मतदारांना मोफत दारू वितरित केल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रभाग २१ मधील उमेदवार डब्बू आसवांनी यांनी केला आहे.



दरम्यान, या संदर्भात माहिती मिळताच प्रभाग क्रमांक २१ मधील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार डब्बू आसवांनी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी चक्क मतदारांना मोफत विदेशी दारू वाटणाऱ्या कारचा पाठलाग करून कारला पोलिसांच्या स्वाधीन केलं आहे. तर कारमध्ये मतदारांना मोफत विदेशी दारूच्या बाटल्या वाटणारे तीन जण पडून दिले आहेत. ज्या कारमध्ये मतदारांना मोफत विदेशी दारूच्या बाटल्या वितरित करण्यात येत होत्या त्या कारमध्ये मोठ्या प्रमाणात परराज्यातील विदेशी दारूच्या बाटल्याचे खोके भरून आढळले आहेत.

या प्रकरणी, डब्बू आसवांनी यांनी पिंपरी पोलीस स्टेशन आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग तसेच निवडणूक विभागाकडे तक्रार केली आहे. पिंपरी पोलीस, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि निवडणूक विभागाने रात्री उशिरा घटनास्थळी पोहचून पंचनामा केला आहे. प्रभाग क्रमांक २१ मधील भाजप उमेदवाराच कार्यकर्त्यांनी मतदारांना मोफत दारू वितरित केल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रभाग २१ मधील उमेदवार डब्बू आसवांनी यांनी केला आहे. या प्रकरणातील दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी डब्बू आसवांनी यांनी केली आहे.

## कुंभमेळ्याचे बजेट गिरीश महाजन विरोधीपक्ष फोडण्यासाठी वापरतात; काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांचा गंभीर आरोप

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी :** तपोवनातील वृक्षतोडीवरून विरोधकांच्याच नव्हे, तर अवघ्या नाशिककरांच्या रडारवर आलेल्या नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अत्यंत गंभीर आरोप केला आहे. गिरीश महाजन कुंभमेळ्याचे बजेट विरोधी पक्ष फोडाफोडीसाठी वापरतात असा अत्यंत गंभीर आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी आज पुण्यामध्ये बोलताना केला. हर्षवर्धन सपकाळ यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही सडकून प्रहार केला.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, अजित पवारांनी अगोदर सरकारमधून राजीनामा द्यावा आणि मग भाजपवर टीका करावी. गोचिडासारखं सत्तेला चिकटून राहू नये, सणसणीत टोलाही लगावला. ते म्हणाले की अजित पवारांनी भाजपमध्ये जे काही सुरू आहे ती नुरा कुस्ती आहे. जैन बोर्डिंग प्रकरणात भाजपने भ्रष्टाचार केला आहे. अजित पवारांनी मुंढवा जमीन प्रकरणांमध्ये भ्रष्टाचार केला असल्याचे ते म्हणाले. त्यामुळे भाजपने अजित पवारांना सत्तेतून बाहेर काढावे, अशी मागणी हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. महापालिका निवडणुकीनंतर काँग्रेसचा कायाकल्प झालेला असेल, असा विश्वास सुद्धा सपकाळ यांनी व्यक्त केला.

दुसरीकडे, तपोवन परिसरातील झाडे छाटण्याच्या मुद्द्यावरून राज ठाकरे यांनी सुद्धा काल झालेल्या विराट सभेत मंत्री गिरीश महाजन यांच्यावर टीकेची झोड उठवली. ते म्हणाले, ''संजय राऊत म्हणाले तसे, यांना तपोवनातील झाडं छाटायची आहेत. त्या महाजनपेक्षा तो लाकूडतोड्या बरा होता, जो सोन्या-चांदीच्या कुऱ्हाडीला भुलला नाही. पण हे लोक झाडं छाटण्याआधी स्वत:च्या पक्षातील कार्यकर्ते आणि माणसं छाटतात. बाहेरून झाडं मागवून ती आता पक्षात लावली जात आहेत,'' असा खोचक टोला त्यांनी लगावला.

## ई-पीक पाहणीची नोंदणी २४ जानेवारीपर्यंत करा; जिल्हाधिकाऱ्यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शासनाच्या महत्त्वाकांक्षी रब्बी हंगाम ई-पीक पाहणी (डिजिटल क्रॉप सर्वे-DCS) उपक्रमाची सुरुवात दि. १० डिसेंबर २०२५ पासून झाली असून शेतकऱ्यांनी आपल्या ७/१२ वर पीक पेरा स्वतः अँड्रॉईड मोबाईलद्वारे नोंदविणे आवश्यक आहे. शेतकरी स्तरावर पीक पाहणी करण्याची अंतिम मुदत दि. २४ जानेवारी २०२६ असून सर्व शेतकरी बांधवांनी वेळेत नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

रब्बी हंगाम २०२५ च्या ई-पीक पाहणी (Digital Crop Survey) अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात आजपर्यंत ८९ हजार ३४०.७५ हेक्टर क्षेत्रावर तसेच एकूण ७ लाख ९९ हजार १९५ पिक पाहणी करावयाच्या ओनर प्लॉटपैकी (owner's plots) ८० हजार ०२८ प्लॉटवर संबंधित शेतकऱ्यांनी DCS व्हर्जन ४.०.५ या मोबाईल ॲपद्वारे आपल्या ७/१२ वर पीक नोंदणी केली आहे. सध्या जिल्ह्यात ई-पीक पाहणीची नोंदणी ३९.३२ टक्के क्षेत्रावर पूर्ण झाली असून उर्वरित क्षेत्रावर सर्व शेतकऱ्यांनी तात्काळ नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ई-पीक पाहणीसाठी DCS व्हर्जन ४.०.५ हे ॲप अँड्रॉईड फोनवर आवश्यक असून गुगल क्रोम अपडेट करून मोबाईलमध्ये इन्स्टॉल करावे. शेत बांधावर जाऊन पीकांची नोंदणी करून माहिती अपलोड करणे अपेक्षित आहे. शेतकऱ्याकडे मोबाईल उपलब्ध नसल्यास किंवा ॲप हाताळण्यात अडचण येत असल्यास संबंधित गावचे तलाठी, कोतवाल तसेच DCS साठी नियुक्त सहाय्यक यांची मदत घ्यावी. ॲपविषयी अडचणी असल्यास तलाठी, कॉमन सर्व्हिस सेंटर किंवा गावातील नियुक्त सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा.

ई-पीक पाहणीद्वारे पीक नोंदणी न केल्यास ७/१२ वर पीक पेरा कोरा राहील व तो नंतर भरता येणार नाही. परिणामी पीक विमा तसेच इतर शासकीय अनुदाने व लाभ मिळविण्यात अडचणी येऊ शकतात. अवेळी पाऊस किंवा इतर नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी पीक विमा मिळण्यासाठी ७/१२ वर अचूक पीक नोंद असणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व शेतकरी बांधवांनी दि. २४ जानेवारी २०२६ पूर्वी आपल्या पिकांची ई-पीक पाहणीद्वारे नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे केले आहे.

## मी आयुष्यातील सर्व आनंद उपभोगलाय, गमावण्यासारखे काहीच नाही, माझ्या नादाला लागलात तर... नाईकांचा शिंदेंना इशारा

**मुंबई/प्रतिनिधी :** माझ्याकडे आता गमावण्यासारखं काहीही शिल्लक राहिलेलं नाही. त्यामुळे माझ्या नादाला लागलात तर तुमचा टांगा पलटी आणि घोडे फरार करेन. उन्माद कराल तर तो काढण्याची माझ्याकडे ताकद आहे, असे वक्तव्य भाजपचे मंत्री गणेश नाईक यांनी केले. नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्यानिमित्ताने एकनाथ शिंदे आणि गणेश नाईक यांच्यातील संघर्ष सध्या शिगेला पोहोचला आहे. गणेश नाईकांनी ठाण्याच्या राजकारणात हस्तक्षेप केल्यानंतर डिवचल्या गेलेल्या एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबईत गणेश नाईकांच्या साम्राज्याला धक्का देण्यासाठी सर्व ताकद पणाला लावली आहे. या पार्श्वभूमीवर गणेश नाईक यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना एकनाथ शिंदे यांना निर्वाणीचा इशारा दिला. मी आज ओपनली सांगतो, माझ्या नादाला जर लागलात ना... गणेश नाईकचं आता काही शिल्लक नाही राहिलेलं नाही. मी माझ्या आयुष्याचा पूर्ण आनंद घेऊन झालाय. मी आज ७५ वर्षांचा आहे, मी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या फिट अँड फाईन आहे. सामाजिक, राजकीय आणि आर्थिकदृष्ट्याही मी सक्षम आहे. मी रोज शांत झोपतो. सीबीआय चौकशी करेल किंवा ईडीची धाड पडेल, याची मला काही चिंता नाही. माझं सगळं ओपन आहे. धास्ती त्यांनाच आहे. लिहून ठेवा, भविष्यकाळात यांच्या गळ्याला फास यांनीच लावून ठेवला आहे.

## शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी! वर्षाला मिळणार आठ हजार रुपये, पीएम किसान सन्मान निधीत वाढीची शक्यता

हैदराबाद - संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २८ जानेवारी रोजी सुरू होणार आहे, तर १ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. २०२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत शेतकऱ्यांच्या अपेक्षा पूर्वीपेक्षा जास्त आहेत. वाढती महागाई आणि शेती खर्चामुळं ग्रामीण भागात चिंता वाढली आहे. यामुळं प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत (पीएम-किसान) शेतकऱ्यांना देण्यात येणारी आर्थिक मदत सरकार वाढवणार का? असा प्रश्न उपस्थित होतोय. विशेषत:, सहा हजारची वार्षिक मदत आठ हजार रुपयांपर्यंत वाढवणार का, यावर वादविवाद सुरू आहेत.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना वार्षिक सहा हजार रुपये मदत मिळते. हे पैसे थेट त्यांच्या बँक खात्यात तीन समान हप्त्यांमध्ये हस्तांतरित केले जातात. कृषी तज्ञ आणि शेतकरी संघटनांचं मत आहे की, सध्याची रक्कम महागाई आणि वाढत्या शेती खर्चाला तोंड देण्यासाठी पुरेशी नाही. यामुळं यावर्षीच्या अर्थसंकल्पात आर्थिक मदत वाढ करण्याची मागणी होत आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, गेल्या काही वर्षांत शेतीचा खर्च सातत्यानं वाढत आहे. बियाणं, खतं, कीटकनाशक, डिझेल, वीज, सिंचन आणि कृषी यंत्रसामग्रीच्या किमती सतत वाढत आहेत. लहान शेतकऱ्यांसाठी वार्षिक सहा हजार रुपयांची मदत अपुरी आहे. जर सरकारनं ही रक्कम वाढवली तर शेतकऱ्यांना शेतीमध्ये गुंतवणूक करण्याचा आणि कर्जावरील अवलंबित्व कमी करण्याचा आत्मविश्वास मिळेल.



ग्रामीण अर्थव्यवस्था वाढण्यास मदत होणार - तज्ज्ञांचं म्हणणं आहे की, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्यामुळं ग्रामीण बाजारपेठेत मागणी वाढेल. शेतकऱ्यांकडं खर्च करण्यासाठी जास्त पैसे असतील तेव्हा ग्रामीण बाजारपेठा सक्रिय राहतील. यामुळं बियाणं, खतं, ट्रॅक्टर आणि कृषी उपकरणांची विक्री वाढेल. लहान व्यापारी आणि स्थानिक व्यवसायांनाही फायदा होईल. अशाप्रकारे पंतप्रधान किसान योजनेतील निधी वाढीचा फायदा केवळ शेतकऱ्यांपुरता मर्यादित राहणार नाही तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होईल.

## कृतिशील प्रयत्नांची जोड हवी...

गेली सुमारे दोन वर्षे भारतातील मध्यम व मोठ्या स्वरूपाच्या उद्योगाचे नेतृत्व करून, त्यांचे व्यवस्थापन अधिक प्रभावीव व्यावसायिक संदर्भात अधिक उपयुक्त व्हावे, यादृष्टीने काम करणाऱ्या जागतिक व्यवसाय विकास केंद्रांनी आपलेकार्य-कर्तव्य यापूर्वीच सिद्ध केले आहे. यासंदर्भातील महत्त्वपूर्ण बाब म्हणजे, २०२६ मध्ये प्रशिक्षित व्यवस्थापकांच्या संख्येत ४० टक्के वाढ अपेक्षित आहे. भारतातील व्यवसाय-व्यवस्थापन विकास केंद्रांचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे, त्याठिकाणी देशपातळीवरच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरांवरील उद्योगांच्या वाढत्या आणि बदलल्या गरजा आणि प्राधान्यक्रमांवर प्रामुख्याने विचार करून त्यानुरूप कृतिशील प्रयत्नांची जोड देण्यात आली आहे. याचे सक्रिय व सकारात्मक परिणाम आता दिसून येऊ लागले आहेत. याच्याच परिणामी, आज आपल्याकडील व्यवसाय-व्यवस्थापन विकास केंद्रांमध्ये परंपरागत व आवश्यक स्वरूपातील उद्योग-व्यवसाय वाढीच्या संदर्भात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरांवरील आवश्यक विषय, त्यांचे शिक्षण-प्रशिक्षण यांच्याच जोडीला उद्योजक-व्यवस्थापकांना आवश्यक अशा व्यवस्थापकीय शैली व कौशल्यांचा आवर्जून समावेश करण्यात आला आहे. त्यामुळेच आज त्याठिकाणी उत्पादन प्रक्रिया व विकास, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, विकसित नेतृत्वक्षमता व निर्णयक्षमता विकास, जागतिकसंदर्भात व्यवसायासाठी आवश्यक माहिती-तंत्रज्ञान व त्याचे विश्लेषण करणे, संपर्क-संवाद प्रक्रियेला अधिक गतिमान व प्रभावी बनविण्यासाठी आवश्यकतेनुसार कृत्रिम बुद्धिमत्तेचा समावेश व वापर करणे, दर्जात्मक सुधारणेसाठी आंतरराष्ट्रीय कार्यपद्धती व मापकांचा अवलंब करणे इ. सक्रिय व अनुभवांवर आधारित पद्धतीने भर दिला जात आहे. याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. आपल्या व्यवसाय-व्यवस्थापन विकास केंद्रांच्या माध्यमातून प्रशिक्षितांच्या संख्येत लक्षणीय स्वरूपात वाढ झालेली आहे. संख्यात्मकदृष्ट्या सांगायचे झाल्यास, २०२४ मध्ये व्यवसाय विकास केंद्रांच्या माध्यमातून २०२४ मधील प्रशिक्षित व्यवस्थापकांची संख्या सहा हजार, ५०० होती, ती २०२५च्या अखेर आठ हजार, ५०० एवढी वाढली आहे, असा एक प्राथमिक अंदाज आहे. या संख्येत प्रचलित वर्षी, म्हणजेच २०२६ मध्ये सुमारे ४० टक्के अशी लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. या वाढीमध्ये जागतिक स्तरावरील उद्योजक-व्यवस्थापकांचा प्रामुख्याने समावेश असून, यावरून आपल्या व्यवसाय विकास केंद्रांची वाढती उपयुक्तताच सिद्ध झाली आहे. व्यवसाय विकास केंद्रांच्या प्रशिक्षणाचा उपयोग आपल्या व्यवस्थापकांच्या प्रशिक्षणासाठी ज्या उद्योग - व्यावसायिक कंपन्या मोठ्या प्रमाणात करतात, त्यामध्ये प्रामुख्याने 'ॲलबर्स्टच', 'मॅक-डोनाल्ड', 'फेडेक्स', 'स्टॅण्डर्ड चार्टर्ड' व त्याशिवाय मोठ्या प्रमाणावर किरकोळ विक्री करणाऱ्या विक्री कंपन्या, पूरक आरोग्यसेवा देणाऱ्या कंपन्या इ. समावेश असून, यामध्ये व्यवस्थापनपदावरील नेमणुकीसाठी अशा प्रशिक्षितांचा प्रामुख्याने समावेश केला जातो. यावर्षीच्या म्हणजेच २०२६ मधील पहिल्याच टप्प्यापासून भारतातील व्यवसाय विकास केंद्रांच्या विकासात्मक स्वरूपात दिसून आलेली बाब म्हणजे, व्यवसाय-विकासाच्या नव्या व वाढत्या उद्योगांच्या व्यवस्थापनविषयक गरजांची प्राधान्य तत्त्वावर व प्रामुख्याने पूर्तता करण्यासाठी अशा पदांवरील उमेदवारांच्या भरतीसाठी भारतात प्रशिक्षित उमेदवारांना प्राधान्य दिले जात आहे. यामागचे मोठे व महत्त्वाचे कारण म्हणजे, आपल्या प्रशिक्षण केंद्रांमध्ये दिल्या जाणाऱ्या व्यावसायिक प्रशिक्षणामध्ये प्रगत तंत्रज्ञान व पद्धतींनुसार कृत्रिम बुद्धिमत्ता व त्यावर आधारित जागतिक व्यवसाय-व्यवहारांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय, सद्यस्थितीतील आर्थिकदृष्ट्या वेगाने विकसित होणाऱ्या विकसित भारताचे प्रतिबिंब पण यानिमित्ताने जगापुढे येत आहेच. नव्या वर्षातील नव्याने होणाऱ्या वा नजीकच्या काळात होऊ घातलेल्या व्यवसाय-व्यवस्थापक वा तत्सम पदावरील भरतीच्या संदर्भात व्यवस्थापकीय पदांवरील उमेदवारांच्या निवड-भरतीच्या संदर्भात प्रामुख्याने काम करणाऱ्या 'एक्सफेनो' कंपनीच्या नव्या अभ्यासातसुद्धा वर नमूद केलेले मुद्दे अधोरेखित करण्यात आले आहेत. याच अभ्यासात भारतातील व्यवसाय-व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षित उमेदवारांची व्यवस्थापन व व्यवस्थापकीय पदांवर निवड करण्यासाठी प्राधान्यक्रमाने निवड करण्यावर जागतिक स्तरावर आज भर दिला जात आहे. अभ्यासात पुढे नमूद केल्यानुसार, उद्योग -व्यवसायाचे व्यवस्थापन यशस्वी पद्धतीने हाताळण्यासाठी प्रभावी व्यवस्थापकांची नेहमीच गरज असते. जागतिक स्तरावरील वाढत्या व्यवसायाला यशस्वी नेतृत्व प्रदान करण्यासाठी प्रशिक्षित व्यवस्थापकांची गरज असते. नेमकी हीच गरज, भारतातील व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांची मोठी व नेमकी मदत होत असल्याने या प्रशिक्षणाचा फायदा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय उमेदवारांना होत असलेल्या दिसून येतो. आपल्या या अभ्यासाच्या संदर्भात 'एक्सफेनो'च सहसंस्थापक कमल कारंथ यांनी नमूद केल्यानुसार, अभियांत्रिकी-तंत्रज्ञानासह प्रगत व्यवसायांना पुढे नेण्यासाठी व्यावसायिक नेतृत्व व निर्णयक्षमतेसह व्यवस्थापनासाठी आवश्यक गुणांची मोठी गरज असते व याच गरजेची पूर्तता भारतातील व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांतर्फे जागतिक स्तरावर होत आहे. याच्याच जोडीला विविध प्रकारच्या स्पर्धांवर मात करून यशस्वी व्यवसाय-व्यवस्थापनाला कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या प्रगत तंत्रज्ञानासह आर्थिक- व्यावहारिक व व्यवस्थापन क्षेत्रासाठी अत्यावश्यक अशा विक्री व्यवस्थापन वा संसाधन व्यवस्थापनाचीसुद्धा तेवढीच गरज असते.व्यवसाय- व्यवस्थापनाच्या संदर्भातील या महत्त्वाच्या गरजांची एकत्रित व एकात्मिक स्वरूपात पूर्तता करणे, ही बाबसुद्धा देशांतर्गत व्यवसाय-व्यवस्थापन मार्गदर्शन केंद्रांच्या संदर्भात विशेष जमेचीठरली आहे. व्यवसाय-व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्रांना मिळणारा वाढता यशस्वी प्रतिसाद पाहता, आम्ही आमच्या व्यवसायात आगामी तीन वर्षांत तिपटीने वाढ करण्याचा संकल्प सोडला असून, त्यादिशेने आमचे प्रयत्न सुरू असल्याची बाब भारतातील प्रमुख अशा व्यवसास-व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्र असणाऱ्या 'अबर्स ॲण्ड मार्सल' कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक मनीश गोयल यांनी व्यक्त केली आहे. याशिवाय, देशातील इतर व्यवसाय-व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्रांनी पण देश-विदेश पातळीवर वाढत्या व्यावसायिक गरजांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने आपली प्रशिक्षण क्षमता व सिद्धता यावर्षी लक्षणीय स्वरूपात वाढविली असून त्यामुळे अर्थातच, विशेषतः आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय व्यवस्थापकांना मोठ्या संधी व विविध देशांतील उद्योगांना मोठे लाभ होणार आहेत.

# भूजल व्यवस्थापन आणि साठा विषयावर कार्यशाळा जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यशाळेचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी :** जल शक्ति मंत्रालय,जल संसाधन, नदी विकास आणि गंगा संरक्षण यांच्या निर्देशानुसार, बुलढाणा जिल्ह्यातील भूजल साठ्याची सद्यस्तिथी, त्यांचे शास्त्रीय व्यवस्थापन आणि भूजल माहितीचा प्रभावी वापर या विषयावर केंद्रीय भूमिजल बोर्ड, नागपूर यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी दि. ७ जानेवारीला कार्यशाळा संपन्न झाली. तसेच भूजल माहितीचे प्रसारण आणि उपयोग व राष्ट्रीय जलभृत मानचित्रण आणि प्रबंधन कार्यक्रम यावर आधारित या कार्यशाळेतून जलसंधारणाचा आराखडा मांडण्यात आला.

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यशाळेची सुरुवात केंद्रीय भूमिजल बोर्ड, नागपूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ एस.एस. पुरती यांच्या उदघाट्नपर भाषणाने झाली. त्यानंतर वैज्ञानिक प्रिती डी .राऊत यांनी बुलढाणा जिल्ह्यासाठीच्या ''राष्ट्रीय जलभृत मानचित्रण आणि प्रबंधन कार्यक्रम'' यावर सविस्तर सादरीकरण केले. यामध्ये जिल्ह्यातील जलभंडाराची वैशिष्ट्ये, उपलब्ध भूजल संसाधने आणि भविष्यातील पाणी व्यवस्थापन धोरणांचा आढावा घेण्यात आला.

कार्यशाळे दरम्यान, 'राष्ट्रीय भूजलस्तर नकाशा अहवाल- बुलढाणा जिल्हा' आणि देशातील कृत्रिम पुनर्भरण संरचनांच्या यशोगाथांवरील कॉफी टेबल बुकचे औपचारिकपणे प्रकाशन करण्यात आले..

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी भूजल माहितीच्या प्रसारासाठी सीजीडब्ल्यूबीच्या प्रयत्नांचे कौतुक केले. शेतकरी आणि विविध संस्थांना माहितीची सुलभ उपलब्धता आणि प्रभावी वापरासाठी, सीजीडब्ल्यूबी आणि जीएसडीएच्या भूजल डेटाबेसचे संयोजन करणारे एकच व वापरण्यास सोपे एकात्मिक पोर्टल किंवा मोबाइल ॲप्लिकेशन असण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. जिल्हास्तरीय नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये या संसाधनांचा सक्रियपणे वापर करण्याचा सल्लाही त्यांनी सर्व संबंधित विभागांना दिला. त्यानंतर एका संवादात्मक अभिप्राय सत्राने कार्यशाळेचा समारोप करण्यात आला. एका क्लिकवर माहिती भूजल विषयक डेटाची माहिती सर्वसामान्यांना आणि प्रशासनाला सहज उपलब्ध व्हावी यासाठी वैज्ञानिक प्रिती राऊत यांनी ग्राऊंडवॉटर डेटा डाउनलोड पोर्टल आणि इनग्रेस, इंडिया वारीस सीजीडब्लूए या पोर्टलच्या वापराचे प्रात्यक्षिक दाखवले आणि त्रि-स्तरीय नियोजन आणि निर्णय घेण्यासाठी त्यांच्या व्यावहारिक उपयोगावर भर दिला. त्यामुळे आता एका क्लिक वर जिल्ह्याच्या भूजल पातळीची माहिती, जिल्ह्याशी निगडित अहवाल मिळणे सुलभ होईल. तज्ज्ञांची उपस्थिती याप्रसंगी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक हिमानी जोशी आणि भूवैज्ञानिक हरीश कठाळे तसेच जिल्हाधिकारी कार्यालय जिल्हा परिषद, मृद व जलसंधारण, जलसंपदा, लघुपाठबंधारे, कृषि अशा विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### महाराष्ट्र लोक सेवा हक्क अधिनियम-२०१५

## अधिसूचित सेवांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी 'आपले सरकार' पोर्टलचा वापर करावा

-विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांचे आवाहन

-ऑनलाईन समस्या निवारण प्रणाली पोर्टलवर उपलब्ध

**अमरावती/प्रतिनिधी :** : महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अन्वये नागरिकांना शासनाकडून प्रदान करण्यात येणाऱ्या विविध अधिसूचित सेवा विहित कालावधीत पारदर्शक, सुलभ व वेळेत उपलब्ध करून देण्याची तरतूद केली आहे. यानुषंगाने नागरिकांनी या सेवांचा लाभ घेण्यासाठी संबंधित शासकीय कार्यालयाशी संपर्क साधावा अथवा ऑनलाईन सेवेसाठी महाराष्ट्र शासनाच्या ''आपले सरकार'' या अधिकृत पोर्टलचा वापर करावा, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

या अधिनियमांतर्गत महसूल, ग्रामविकास, नगरविकास, सामाजिक न्याय, आरोग्य, शिक्षण इत्यादी विभागांमार्फत नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या असून, त्या सेवा ठराविक कालमर्यादेत देणे संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना बंधनकारक आहे. लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा नाकारली गेल्यास किंवा विलंब झाल्यास नागरिकांना

लोकसेवा हक्क कायदा
Right to Public Service Act

अपील करण्याची तरतूदही या अधिनियमात करण्यात आलेली आहे.

शासनाच्या विविध कामकाजाबाबत नागरिकांच्या समस्यांचे प्रभावी व विहीत वेळेमध्ये निवारण होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ''आपले सरकार'' पोर्टलवर ऑनलाईन समस्या निवारण प्रणाली उपलब्ध करून दिली आहे. नागरिक आपल्या समस्या पोर्टलवर नोंदवू शकतात, ज्यावर संबंधित विभागातील सक्षम अधिकाऱ्यांना अधिनियमांतर्गत विहित कालावधीत कार्यवाही करून समस्या निकाली काढणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या अधिनियमांतर्गत समस्या निवारणात दिरंगाई झाल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अपील करण्याची सुविधा देखील उपलब्ध असून, यामुळे शासन व नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी व उत्तरदायी होण्यास मदत होत आहे. अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा तसेच वाशिम या सर्व जिल्ह्यातील नागरिकांनी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांनी केले आहे.

## 'नवरी मिळे हिटलर'ला नंतर लीलाची आणखी एक मालिका, वल्लरीला कशी मिळाली भूमिका?

'नवरी मिळे हिटलरला'नंतर लीला पुन्हा एका नव्या टीव्ही मालिकेत झळकणार असून या मालिकेत वल्लरीला महत्त्वाची भूमिका मिळाली आहे.अभिनेत्री 'वल्लरी विराज' नवरी मिळे नवरीला नंतर आणखी एका नवीन मालिकेत दिसणार आहे. ती पुन्हा एकदा झी मराठीवर 'शुभ श्रावणी' या मालिकेतून भेटीला येत आहे. नव्या कथानकामुळे आणि दमदार कलाकारांमुळे ही मालिका चर्चेत आली आहे.

या मालिकेत ती शिक्षणमंत्र्यांच्या मुलीची भूमिका साकारत आहे. वल्लरी म्हणाली- माझ्या नवीन मालिकेचं नाव 'शुभ श्रावणी' आहे आणि माझं नाव मालिकेत श्रावणी आहे. ती एका शिक्षणमंत्र्याची मुलगी आहे आणि म्हणून घरी प्रेमळ आपुलकीच वातावरण नसून कडक नियमबद्ध असं वातावरण आहे. श्रावणीला आई नाहीये, तिचे बाबा पण तिच्याशी बोलत नाहीत. श्रावणीकडे पैसे मालमत्ता भरपूर आहे, तिच्या वडिलांनी सुखसोयी म्हणून मोठा बंगला, गाडी, कपडालत्ता, नोकर सुविधा ठेवलेल्या आहेत. पण तिच्याकडे तिच्या बाबांचं प्रेमचं नाही.''

''तिच्या बाबांनी लहानपणापासून तिच्याकडे बघितलं नाही. तिच्याशी ते प्रेमाने का बोलले नाहीत. त्यामुळे श्रावणीचा सारखा प्रयत्न असतो की असं काय करू जेणेकरून बाबा तिच्याकडे लक्ष देतील, ते तिच्याशी बोलतील. कदाचित परीक्षेत चांगले मार्क आणले कि ते तिच्याशी बोलतील म्हणून ती भरपूर अभ्यास करते.''

चार-पाच महिन्यानंतर मला कॉल आला, कि आम्हाला तुझ्या सोबत परत काम करायचंय, आमची 'शुभ श्रावणी' मालिका येतेय त्यात श्रावणी व्यक्तिरेखेची भूमिका तूच करायचीय अशी आमची इच्छा आहे आणि मला ते ऐकून खूपच आनंद झाला, नकार देण्याचा काही विषयच नव्हता, आणि अजिबात दुसरा तिसरा काहीच विचार न करता मी मालिका स्वीकारली. या भूमिकेसाठी खास तयारी केली आहे. माझी आधीची जी भूमिका होती लीलाची, ती खूपच उत्साही, अल्लड होती. परंतु आता श्रावणी आहे ती समजूतदार, सोज्वळ आणि शांत अशी आहे, मनात कितीही तिला वाईट वाटलं असेल, तिच्या मनात कितीही प्रश्नांचा कल्लोळ असला तरी चेहऱ्यावर स्मितहास्य ठेऊन वावर करणारी अशी आहे.''लोकेश गुप्तेजी माझ्या वडिलांच्या भूमिकेत आहेत, आसावरी जोशी आत्याच्या भूमिकेत आहे.

# संत वामनभाऊ महाराजांचे विचार पिढ्यान्पिढ्या मार्गदर्शक -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## संत वामनभाऊ महाराज यांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त कळशारोपण कार्यक्रम







**बीड/प्रतिनिधी :** समाजाला अध्यात्म, सदाचार आणि एकोप्याचा मार्ग दाखवणारे नाथ परंपरेतील महान संत वामनभाऊ महाराज यांचे विचार काळाच्या ओघातही अधिकच सुसंगत ठरत असून, त्यांचे कीर्तन, नामस्मरण आणि उपदेश पिढ्यान्पिढ्या समाजाला मार्गदर्शन करत राहतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

संत वामनभाऊ महाराजांच्या ५० व्या, सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, गडाचे महंत विठ्ठल महाराज, आमदार धनंजय मुंडे, सुरेश धस, मोनिका राजळे, आमदार योगेश क्षीरसागर, माजी आमदार जयदत्त क्षीरसागर, भीमराव धोंडे, विक्रमानंद शास्त्री, स्वामी विश्वेश्वरानंदजी महाराज आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संत वामनभाऊ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी आणि आशीर्वाद घेण्यासाठी मी येथे आलो आहे. हे निमंत्रण मुख्यमंत्र्याला नसून, संत वामनभाऊ महाराजांच्या एका भक्ताला आणि गहिनीनाथ गडाच्या सेवकाला विठ्ठल महाराजांनी दिलेले आहे, या भावनेतून मी येथे उपस्थित आहे. नाथ परंपरेतील महान संत आणि शंकराचा अवतार मानले जाणारे संत वामनभाऊ महाराज हे समाजाला दिशा देणारे सद् गुरु होते. दऱ्या-खोऱ्यांतून प्रवास करत त्यांनी भागवत पंथाचा प्रचार केला आणि समाजात एकोप्याचा संदेश दिला. मन शुद्ध असेल तर आचरण शुद्ध होते हा विचार त्यांनी समाजमनात रुजवला. त्यांच्या उपदेशामुळे चोरसुद्धा चोरी सोडून माळकरी झाले, ही त्यांची अलौकिक किमया होती, असे त्यांनी सांगितले.

संत वामनभाऊ महाराजांना वाचासिद्धी होती, असे सांगितले जाते. त्यांच्या कीर्तनातून आणि विचारातून समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत अध्यात्म पोहोचले. कितीही पिढ्या बदलल्या तरी त्यांचे कीर्तन, नामस्मरण आणि उपदेश आजही तितकेच महत्त्वाचे आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

प्रसाद वितरणाची परंपरा हे संत वामनभाऊ महाराजांचे मोठे वैशिष्ट्य असून, जिथे-जिथे सप्ताह होतो तिथे भाविकांसाठी पोटभर जेवणाची व्यवस्था केली जाते. पुढील सप्ताहासाठी विविध गावांतून मोठ्या प्रमाणावर मागणी असणे ही संत वामनभाऊ महाराजांच्या कृपेची साक्ष असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी शासनाच्या योजनेअंतर्गत विविध कामे हाती घेण्यात आली असून ती टप्प्याटप्प्याने पूर्ण होत आहेत. पंढरपूर येथे आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यात आली असून, पालखी मार्गाच्या विकासासाठीही लवकरच काम करण्यात येईल, असे आश्वासन देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, मुख्यमंत्री म्हणून नव्हे तर गहिनीनाथ गडाचा एक अनुयायी म्हणून येथील सर्व विकासकामांची जबाबदारी लोकप्रतिनिधींसह मिळून पार पाडली जाईल. दरवर्षी संधी मिळेल तेव्हा गहिनीनाथ गडावर येऊन संत वामनभाऊ महाराजांचा आशीर्वाद घेत राहीन, असे मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, संत वामनभाऊ महाराजांनी कठीण काळात माणसाला माणूस बनवण्याचे संस्कार समाजाला दिले. सत्य, एकोपे आणि सेवाभावाचे हे संस्कार आजही महाराष्ट्रभर जिवंत आहेत. कष्टकरी, गरीब आणि वंचित समाज वामनभाऊ महाराजांचे विचार विसरलेला नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून गहिनीनाथ गडाच्या विकासाला भव्य स्वरूप मिळत असून, हे कार्य भाविकांच्या श्रद्धेला साजेसे ठरत आहे. सामान्य माणसाच्या श्रद्धास्थानांच्या विकासासाठी केलेले हे कार्य निश्चितच लोकांचा आशीर्वाद मिळवून देणारे आहे असा उल्लेख त्यांनी केला.९

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# कु. आरती खंडागळे हिची ऑल इंडिया युनिव्हर्सिटी बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने दिनांक ५ ते ७ जानेवारी २०२६ या कालावधीत नागपूर येथे आयोजित युनिव्हर्सिटी मॅचेस स्पर्धेत शारीरिक शिक्षण महाविद्यालय, कोराडी येथील विद्यार्थिनी कु. आरती रमेश खंडागळे हिने बॉक्सिंग खेळात ५४ ते ५७ किलो वजनगटात प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णयश संपादन केले.

मात्र या यशामागे केवळ खेळ नाही, तर संघर्षाची, त्यागाची आणि जिद्दीची एक भावनिक कहाणी दडलेली आहे. घरातील हालाखीची परिस्थिती, मर्यादित साधनसामग्री आणि अनेक अडचणी असूनही आरतीने आपले स्वप्न सोडले नाही. गावापासून दूर राहत तिने अपार मेहनत घेतली. तिच्या या जिद्दीवर व विश्वासावर तिचे वडील रमेश खंडागळे कायम ठाम राहिले.

जेव्हा आरतीने अंतिम लढत जिंकत विजय निश्चित केला, तेव्हा तिच्या वडिलांच्या डोळ्यात अश्रू तरळले. ''माझी मुलगी अडचणींवर मात करून देशासाठी नाव कमवतेय, हे पाहणे हाच माझा खरा विजय आहे,'' असे भावूक शब्द त्यांनी सांगितले.

स्पर्धेदरम्यान आरतीने आत्मविश्वास, तांत्रिक कौशल्य व झुंजार खेळाचे अप्रतिम प्रदर्शन करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. तिच्या या यशात मार्गदर्शक श्री. संकेत धामंदे सर (एन. एस. कोच) यांचे मोलाचे योगदान असून त्यांच्या योग्य प्रशिक्षणामुळे तिच्या खेळात सातत्य व धार निर्माण झाली.

या कामगिरीच्या जोरावर कु. आरती खंडागळेची ऑल इंडिया युनिव्हर्सिटी बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली असल्यामुळे बॉक्सिंग परिवार, शेगाव यांच्या वतीने तिचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे. यावेळी बॉक्सिंग असोसिएशन



बुलढाणा यांच्यावतीने असोसिएशनचे अध्यक्ष माननीय विठ्ठलराव लोखंडकार यांच्या मार्गदर्शनाखाली निलेश इंगळे उपाध्यक्ष, प्रा. डॉ. संतोष आंबेकर कोषाध्यक्ष, जिल्हा बॉक्सिंग संघटनेचे जिल्हा सचिव श्री संकेत धामंदे, विनोद टिकार सदस्य, राज सोळंकी सहसचिव तसेच जिल्हा प्रशिक्षक संकेत रामदास सरोदे ,पी. यू. राठोड सर यांनी कुमारी आरती हिच्या उल्लेखनीय यशाबद्दल अभिनंदन केले असून सर्वच स्तरातून तिच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे .संघर्षातून उभारी घेतलेली घेऊन आणि मनात जिद्द असेल तर मुलीही कशामध्ये कमी राहू शकत नाहीत. हेही मुलींसाठी आरतीने दाखवून दिले आहे. ही खेळाडू अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## निजामपूरचे 'श्रीरामपूर' नामांतर लवकरच?

**रिसोड/प्रतिनिधी :** रिसोड तालुक्यातील रिसोड शहरालगत असलेल्या मौजे निजामपूर ग्रामपंचायतीच्या नामांतराचा ऐतिहासिक निर्णय आता अंतिम टप्प्याकडे जात असल्याचे चित्र आहे. गावाचे नाव बदलून 'श्रीरामपूर' करण्याच्या प्रक्रियेला लोकनियुक्त सरपंच उषा किसन जाधव यांच्या ठाम नेतृत्वामुळे निर्णायक वेग मिळाला आहे.



मोगलाई निजामशाहीच्या काळातील 'निजामपूर' हे नाव बदलावे, ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामस्थांकडून प्रलंबित होती. मात्र, सरपंच पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर उषा किसन जाधव यांनी या संवेदनशील विषयाला प्राधान्य देत ग्रामस्थांच्या भावना शासनदरबारी प्रभावीपणे मांडल्या. त्यांच्या पुढाकाराने ग्रामपंचायतीत अधिकृत ठराव मंजूर करण्यात आला असून, नामांतराचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे. ग्रामविकासाच्या दृष्टीने तसेच ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन गावाला नवी, सन्मानाची ओळख मिळावी, हा सरपंचांचा स्पष्ट हेतू असल्याचे ग्रामस्थांकडून सांगितले जात आहे.

सरपंच उषा किसन जाधव यांच्या या निर्णयात्मक भूमिकेमुळे ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत असून, निजामपूरचे नाव 'श्रीरामपूर' होण्याची अपेक्षा आता अधिक बळावली आहे.

''निजामशाहीच्या काळातील 'निजामपूर' हे नाव बदलून 'श्रीरामपूर' करणे ही केवळ नामांतराची प्रक्रिया नसून, ग्रामस्थांच्या भावना आणि आपल्या लोकशाही मूल्यांचा सन्मान आहे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आम्ही याबाबत ठराव मंजूर केला असून, शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे. ग्रामस्थांच्या सहकार्याने लवकरच हे नामांतर प्रत्यक्षात येईल, असा विश्वास आहे.''

सौ उषा किसन जाधव
लोकनियुक्त सरपंच निजामपूर

## प्रसिद्ध गायकाची मंदिराबाहेर गोळ्या झाडून हत्या; हत्याकांडातील आरोपीचा हृदयविकाराच्या झटक्याने निधन,

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रसिद्ध लोकप्रिय गायक गुलशन कुमार यांची ओळख 'कॅसेट किंग' म्हणून होती. त्यांनी गायलेली गाणी आजही अजरामर आहेत. तसेच त्यांची भजने रसिकांच्या मनात विशेष स्थान राखून आहेत. मात्र, २८ कॅसेट किंगचा आवाज कायमचा थांबला. गुलशन कुमार यांची निर्घृण हत्या करण्यात आली. या प्रकरणानंतर कारवाई, चौकशी झाली. गुलशान कुमार हत्या प्रकरणात अब्दुल रौफ उर्फ दाऊद मर्चेंटला पोलिसांनी ताब्यात घेण्यात आलं. त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. दरम्यान, गुरूवारी त्याला हृदयविकाराचा झटका आला. यामुळे आरोपीचे निधन झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून अब्दुल रौफ उर्फ दाऊद मर्चंट याची प्रकृती प्रचंड खालावली होती. काही दिवसांपूर्वी त्याला हृदयविकाराचा झटका आला होता. प्रकृती नाजूक झाल्यानंतर दाऊद मर्चटला रूग्णालयात हलवण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला. अबु सालेमच्या सांगण्यावरून गुलशन कुमार यांच्यावर गोळ्या झाडणाऱ्या दाऊद मर्चटने ६० व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, दाऊद मर्चटला ३० डिसेंबर २०२५ रोजी हृदयविकाराचा झटका आला होता. त्याची प्रकृती अस्वस्थ झाल्यानंतर त्याला तातडीने शहरातील सरकारी रूग्णालयात नेण्यात आलं. ३ जानेवारीपर्यंत त्याच्या प्रकृतीत सुधारणा झाली. ४ जानेवारीपर्यंत त्याला रूग्णालयातून डिस्चार्च देण्यात आला. परंतु, गुरूवारी त्याला अस्वस्थ वाटू लागलं.

## कुपवाड्यातील दहशतवाद विरोधी कारवाईत महाराष्ट्राच्या शूर जवानाला वीरमरण; शहीद नायक वैभव लहानेंना अकोल्यात मानवंदना

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अकोला जिल्ह्यातील सेवारत सैनिक नायक वैभव श्रीकृष्ण लहाने या शूर जवानाचे नाव आज कायमच इतिहासात कोरलं गेलंय. जम्मू काश्मिरमध्ये कुपवाडा सेक्टरमध्ये कार्यरत असलेल्या नायक वैभव लहाने या शूरवीराने मातृभूम िसाठी आणि तिरंग्यासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. भारतीय सेनेतील १२ मराठा लाईट इन्फंट्री तुकडीत कार्यरत असताना दहशतवाद विरोधी (काउंटर इन्सर्जन्सी) कारवाई दरम्यान नायक वैभव लहाने यांना वीरमरण आले आहे.

जम्मू - काश्मीर मधील कुपवाडा सेक्टर येथे कर्तव्यावर असताना ७ जानेवारी रोजी त्यांना हे वीरमरण आलेय. अकोल्याचा सुपूत्राच्या या वीरमरणाच्या बातमीने संपूर्ण जिल्ह्यात शोककळा पसरली आहे.देशसेवेत कर्तव्य बजावत असताना अकोला जिल्ह्यातील सेवारत सैनिक नायक वैभव श्रीकृष्ण लहाने यांना वीरमरण आले. ते १२ मराठा लाइट इन्फंट्री या युनिटमध्ये कार्यरत होते. शहिद लहाने हे जम्मू काश्मिरमध्ये कुपवाडा सेक्टरमध्ये कार्यरत होते. दि. ७ जानेवारीला ते शहीद झाले. त्यांचे मूळ गाव कपिलेश्वर आहेय. त्यांचे पार्थिव ९ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास कपिलेश्वर येथे पोहोचले. तिथे त्यांना मानवंदना देऊन त्यांच्या म ूळगावी सैनिकी व शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सैनिकांनी मानवंदना देत पोलीस विभागाच्या वतीने बंदुकीच्या ३ फैरी झाडून सलामी दिली.

यावेळी 'शहीद जवान अमर रहे', 'भारत माता की जय'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. तसेच संपूर्ण गावकऱ्यांच्या डोळ्याच्या कडा पाणावलेल्या होत्या. नायक लहाने यांच्या वीरमरणाच्या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.शहीद वैभव लहाने यांचे मूळ गाव कपिलेश्वर (पो. वडद, ता. अकोला) असून, सध्या त्यांचे कुटुंब श्री गजानन नगरी, कौलखेड येथे वास्तव्यास होते. ते दोन भावंडांपैकी मोठे होते तर त्यांचे धाकटे बंधू राजू लहाने हे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात (ण्घ्एइ) जवान म्हणून देशसेवेत कार्यरत आहेत. एकाच कुटुंबातील दोन जवान देशाच्या सेवेत असल्याने लहाने कुटुंबाचा देशाभिमान अधिकच अधोरेखित झाला आहे.

नायक वैभव लहाने यांच्या या वीरम रणामुळे अकोला जिल्हा शोकसागरात बुडालाय. शिवाय त्यांच्या बलिदानाचा अभिमान प्रत्येक भारतीयाच्या मनात सदैव जिवंत राहील. त्यांच्या त्यागाम ुळेच देश सुरक्षित आहे, ही भावना प्रत्येक नागरिकाच्या मनात अधिक दृढ झाली आहे. अशा वीर जवानांचे ऋण देश कधीही विसरू शकणार नाही. अशी भावना नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहे.

## शिंदेंच्या शिवसेनेचा भाजपला दे धक्का; आमदारावर आरोप, भाजपचे तीन माजी नगरसेवक शिवसेनेत

**ठाणे/प्रतिनिधी :** राज्यात महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. या निवडणुकांतील काही ठिकाणी थेट भाजप विरुद्ध शिवसेना असा सामना पाहायला मिळत आहे. त्यामध्ये, छत्रपती संभाजीनगर, पुणेसह अनेक ठिकाणी भाजप विरुद्ध शिवसेना लढतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे, स्थानिक नेते बेरजेचं गणित आखत आहेत. मात्र, दोन्ही पक्षात एकमेकांनी एकम ेकांचे पदाधिकारी फोडू नये असं ठरलं असताना, आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी भाजपाचे तीन माजी नगरसेवक यांना आपल्या शिवसेनेत प्रवेश दिला आहे. यावेळीस, भाजप नेते तथा आमदार नरेंद्र मेहतांवर या तिन्ही माजी नगरसेवकांनी आगपाखड केली आहे. ठाणे जिल्ह्यातील मिरा भाईंदरमध्ये शिवसेना शिंदे गट आणि भाजपा यांच्यात चुरशीची लढत होत आहे. त्यातच, निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर इथे मोठी घडामोडी घडीली आहे. येथील भाजप नेते नरेंद्र मेहता यांच्या कथित हुकूमशाही कारभाराला कंटाळून भाजपच्या माजी नगरसेविका व नगरसेवकांनी शिवसेना (एकनाथ शिंदे गट) मध्ये प्रवेश केल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी सांगितले. भाजपच्या माजी नगरसेविका दीपाली मोकाशी, वीणा भोईर तसेच नगरसेवक सूर्यकांत भोईर यांनी शिवसेनेत आज जाहीर प्रवेश केला आहे.शिवसेना पक्षप्रवेशानंतर मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, ''या सर्व नेत्यांना शिवसेनेत सन्मान आणि महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देण्यात येतील. मीरा-भाईंदर शहरात यावेळी भगव्याची लाट असून, जो कोणी भगवा हाती घेईल, त्याच्या पाठीशी शिवसेना आणि प्रताप सरनाईक ठामपणे उभे राहतील. तर तिन्ही नगरसेवकांनी आम्ही भाजपामध्ये अनेक वर्ष काम करूनही आम चं तिकीट कापण्यात आलं. भाजपमध्ये फक्त नरेंद्र मेहता यांचे जवळचे मित्र आणि ठेकेदारांचाच विचार केला गेला असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# पाटील विद्यालय, बेलगाव येथे आनंद मेळावा उत्साहात

## विद्यार्थ्यांच्या सहभागातून २५ स्टॉल्स ग्रामस्थ व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**बेलगाव/प्रतिनिधी :** दि. ९ महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालय, बेलगाव येथे आनंद मेळाव्याचे भव्य आयोजन करण्यात आले. या मेळाव्याचे उद्घाटन पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी प्रमोद रायमुलकर यांनी केले. यावेळी संस्थेचे संचालक प्रकाशराव बाजड, सतीश वानखेडे व दिलीप वानखेडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत एकूण २५ खाद्यपदार्थांचे स्टॉल्स उभारले





होते. इडली-सांबर, आपे-चटणी, वडापाव, उडीद वडा, पाणीपुरी, पुरी-भाजी, पॅटीस, पास्ता, भेळ, मठ्ठा, समोसा, कचोरी, चना उसळ, जामुन आदी विविध पदार्थांनी मेळाव्यात रंगत आणली. विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगार, आर्थिक नियोजन व व्यवहारज्ञानाचे प्रत्यक्ष अनुभव घेतले. या उपक्रमाला गावातील विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. आनंद मेळाव्यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमाचे आयोजन कलाशिक्षक सचिन रहाटे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक कुटे, कावरखे सर, वानखेडे सर, गीते सर, मेटांगळे सर, जायभाये सर, गायकवाड सर, साखरे सर, खुशालराव मेटांगळे, विजय दाभाडे, गजानन देशमुख, पुनम वानखेडे, मधुकर कांबळे तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनींनी विशेष परिश्रम घेतले. या आनंद मेळाव्याचे सर्वत्र कौतुक


## शब्दकोडे क्र. 59

आडवे शब्द

१. भारताचे माजी रेल्वेमंत्री ७. अकस्मात ९. दोन मैलांचे अंतर ११. प्रत्येक, शंकर १२. प्रत्येक वर्षी १४. पळून जाणे १५. मोठे शहर, गाव १६. कविता लिहणारा १७. हट्टी २०. फोडमधील द्रव २१. रंग २२. वारा, हवा २३. कायदेशीर २६. लाजीरवाणे २७. हिचा 'एकच प्याला' अनेक कुटुंबांची वाहताहत करणारा २९. फोल, व्यर्थ ३०. कारस्थानी ३२. बेचव ३४. 'बहिरी' शिकारी पक्षी ३६. मृत्यू नसलेला ३७. तापापूर्वीचे अंग मोडून येणे ३८. नमस्काराचा एक शब्द ४१. पाप ४३. कोणत्याही गोष्टीतील 'अर्थ' (ला.) ४४. बैठक ४५. प्रमाणपत्र ४६. छातीत होणारी आग ४७. मऊ ४८. खोकला ५१. श्रावणी शेंगभाजी ५१अ. अफवा, वावडी ५२अ. 'एअर इंडिया'चे बोधचिन्ह ५३. तारणहार ५४. परिचय ५६. क्रिकेटमधील शून्य (इंग्रजी) ५७. बाजू, पक्ष ५८. गावगप्पांचे ठिकाण ६०. पगार ६२. ओरखडा ६४. छोटे चर्मवाद्य ६६. कशा प्रकारचा ७०. मौज, गंमत ७०अ. दोन वेळा म्हटल्यास एक देशी खेळ ७१. एक द्विदल धान्य ७२. शर्करा ७३. बातमी (हिंदी) ७४. पावलाचा खालचा भाग ७६. लहान मूल ७८. केवड्याचे रान ९. धुणे ८०. आवरणातील छोटासा तुकडा ८१. यथेच्छ

उभे शब्द

१. संगोपन २. तीन तास ३. तात्पर्य ४. आपसातील युद्ध ५. किंमत ६. वस्ती ८. चहा पिण्याचे जोडसाधन ९. कोकिळ (हिंदी) १०. खळबळजनक ११. केसांची बट १६. कान १८. गंध १९. केविलवाणा २१. जेवणापूर्वी म्हणण्याचा ोक- '--- नाम घ्या श्रीहरीचे' २२. घोडा २४. करुणा, कीव २५. दागदागिने २७. सेवक २८. विजयादशमी ३१. पुन्हा ३३. फळातील द्रव ३५. चाणक्यनिती ३७. पंकज ३८. ढीग ३९. चिंतन ४०. कलावंत ४२. सत्व ४३. राजनीतीशी संबंधित ४४. बोंबाबोंब, हाकाटी ४९. समानता ५०. पटाईत, निष्णात ५२. कढी, मठ्ठा, लस्सी असे याचे कितीतरी प्रकार! ५५. जखमेवरचा पापुद्रा ५९. आश्चर्य ६१. नजरेचा पहारा ६३. श्रीरामाचे स्तोत्रकवच ६५. न्याहारी ६७. कणीदार ६८. कौशल्य ६९. वस्तू, माल ७४. शरीर ७५. रस्ता, मार्ग ७६. कठीण प्रसंग ७७. विडा



### शब्दकोडे क्र. 58 चे उत्तर

आडवे उत्तर

१.यथा राजा तथा प्रजा ६.सरमिसळ १०.वर ११.नगर १२.तवा १३.वरण १५.समानता १७.भाल १८.रस १९.कामा २०.टरटर २१.सजग २२.शपथ २४.बराख २७.नीट २८.तीर २९.काळीज ३०.वापर ३२.काच ३४.काळा ३५.वजन ३६.जरतर ३७.कलप ३८.बनावट ३९अ.की ४०.काका ४१.परकायाप्रवेश ४४.कोंबडा ४६.सुवास ४८.रोमण ४९.गळ ५१.वगार ५२.मिलाप ५३.कात ५४.माला ५५.पाल ५६.लोक ५७.कामना ६०.शिरकाव ६२.कणेर ६४.लड ६५.ठिक ६६.फणस ६९.कसर ७२.चकाकी ७३.वारा ७५.नर ७६.थापाडया ७७.मार ७८.खणखणीत

उभे उत्तर

१.यथावकाश २.मारीच ३.जार ४.थाटमाट ५.जाणता ६.सरबत ७.मितभाशी ८.सवाल ९.सरसगट १४.रमापती १५.सरस १६.नरबळी १८.रजनीचर २३.थरकाप २५.राजवट २६.साप २९.कामना ३०.वाण ३१.रज ३२.कातर वेळ ३३.एकलकोंडा ३८.बकासुर ३९.मकान ४१.परोपकारी ४२.रम ४३.प्रगतशील ४५.डावलणे ४७.समीकरण ५०.तलाव ५४.माका ५५.पाककला ५८.मकान ५९.नामा ६१.रडकथा ६६.फकीर ६७.सवा ६८.करणी ७०.सपान ७१.रडया ७२.चर ७४.राख ७५.नख

# डोणगावमधील मोकाट कुत्र्यांच्या दहशतीवर अखेर धरपकड कारवाई

## 'दैनिक आपला विदर्भ'च्या वृत्ताची प्रशासनाने घेतली दखल







**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव परिसरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या मोकाट कुत्र्यांच्या दहशतीवर अखेर प्रशासनाने ठोस कारवाई सुरू केली असून, यामागे दैनिक आपला विदर्भने केलेल्या सडेतोड वृत्तांकनाची महत्त्वाची भूमिका ठरली आहे.

डोणगावमधील मुख्य रस्ते तसेच अंतर्गत भागांत मोकाट कुत्र्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला असून, शाळकरी मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि पादचाऱ्यांवर हल्ल्याचा धोका निर्माण झाल्याचे वास्तव दैनिक आपला विदर्भने ५ जानेवारी रोजी ठळकपणे मांडले होते.

या वृत्तामुळे नागरिकांमधील भीतीचे वातावरण स्पष्टपणे समोर आले होते. सकाळ-संध्याकाळ घराबाहेर पडणेही अवघड झाले असून, प्रशासनाकडून या गंभीर समस्येकडे होत असलेल्या दुर्लक्षावरही वृत्तात बोट ठेवण्यात आले होते. या वृत्ताची दखल घेत प्रशासन खडबडून जागे झाले. त्यानंतर ७ जानेवारी रोजी शेतकरी क्रांतिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर टाले यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह पंचायत समिती, मेहकर येथे ठिय्या आंदोलन करत तातडीच्या कारवाईची मागणी केली. याच वेळी शिवसेनेचे अमोल धोटे यांनीही हा मुद्दा आक्रमकपणे मांडत प्रशासनावर दबाव वाढवला. या घडामोडीनंतर पंचायत समिती, मेहकर यांनी ग्रामपंचायत डोणगावला मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नावर तातडीने कार्यवाही करण्याचे लेखी आदेश दिले. विशेष म्हणजे या आदेशाची प्रत थेट जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठवण्यात आल्याने प्रकरणाला अधिक गांभीर्य प्राप्त झाले.

या आदेशानंतर डोणगाव ग्रामपंचायतीने प्रत्यक्ष कृतीला सुरुवात करत मोकाट कुत्रे पकडण्याची मोहीम हाती घेतली आहे. आतापर्यंत अनेक मोकाट कुत्रे पकडण्यात आले असून, नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले आहे.

या मोहिमेचा पुढाकार ग्रामपंचायत प्रशासन व ग्रामपंचायतीचे सरपंच चरण पाटील आखाडे यांनी घेतला आहे. ''फक्त पत्रव्यवहार नव्हे, तर प्रत्यक्ष कृती आवश्यक आहे,'' हे या कारवाईतून स्पष्ट झाले असून, दैनिक आपला विदर्भच्या दणक्यामुळेच हा प्रश्न मार्गी लागल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे. जनतेचा आवाज बनून प्रशासनाला आरसा दाखवणारे दैनिक आपला विदर्भ पुन्हा एकदा प्रभावी वृत्तपत्र ठरले असून, लोकहिताच्या प्रश्नांवर सातत्याने दणका देणारे माध्यम म्हणून त्याची भूमिका अधोरेखित झाली आहे.

# नशेची औषधे प्रिस्क्रिप्शनशिवाय विकू नयेत - सहाय्यक आयुक्त गजानन घिरके

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** समाजाचे आरोग्य जपण्याची महत्त्वाची जबाबदारी औषध विक्रेत्यांवर असून नवी पिढी नशेकडे वळू नये यासाठी नशेची औषधे प्रिस्क्रिप्शनशिवाय विकू नयेत, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त (औषधे) गजानन घिरके यांनी केले. एनडीपीएस ॲक्टच्या अनुषंगाने सर्व केमिस्ट व ड्रगिस्ट बांधवांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असेही त्यांनी सूचित केले.

अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने आयोजित कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रमात गजानन घिरके यांनी ड्रग अँड कॉस्मेटिक्स ॲक्ट, ड्रग अँड मॅजिक रेमेडीज ॲक्ट, मेडिकल डिव्हायसेस नियम २०१७ तसेच नार्कोटिक अँड सायकोट्रॉपिक संबंधित कायदे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. औषध विक्री करताना संबंधित कायद्यांचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

मार्गदर्शनात त्यांनी डॉक्टरांनी 'शेड्युल-के'चे पालन करावे, घाऊक विक्रेत्यांनी कायद्याच्या चौकटीतच व्यवसाय करावा व डॉक्टरांना थेट मोठ्या प्रमाणात औषध पुरवठा टाळावा, असे स्पष्ट केले. तसेच डॉक्टरांनी आवश्यक औषधांची मागणी लिखित स्वरूपात नोंदवावी व बिलाप्रमाणेच औषधसाठा खरेदी करावा. बिना बिल औषधे खरेदी करणे, विकणे किंवा साठवणे हा कायद्यानुसार गुन्हा असल्याची जाणीव ठेवून समाजाला निकोप सेवा देण्याची जबाबदारी पार पाडावी, असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमास प्रमोद टाकळकर, पांडुरंग इंगळे तसेच इतर फार्मसिस्ट उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन गोपाळ गांधी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेचे तालुका अध्यक्ष उमेश इंगळे यांनी विशेष सहकार्य केले.

# राज्यस्तरीय पुरस्काराने शिवाजीराव काळुसे, प्रशांत काळबांडे,



**किनगांव राजा/प्रतिनिधी :** किनगाव राजा येथील सेवानिवृत्त शिक्षक शिवाजीराव काळुसे व युवा उद्योजक प्रशांत काळबांडे यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत संगमनेर (जि. अहिल्यानगर)येथे राज्यस्तरीय पुरस्काराने ता.१० जानेवारी रोजी सन्मानित करण्यात आले.शिवाजीराव काळुसे यांना राज्यस्तरीय प्रगतीशील शेतकरी पुरस्कार, तर प्रशांत काळबांडे यांना राज्यस्तरीय कृषीरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शिवाजीराव काळुसे हे उच्च श्रेणी मुख्याध्यापक म्हणून सन २०१९ मध्ये सेवानिवृत्त झाले,विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणीत मोलाचे योगदान दिल्यानंतर निवृत्त जीवन निवांत न घालवता त्यांनी शेतीकडे वळण्याचा समाजासाठी प्रेरणादायी निर्णय घेतला.सेवानिवृत्तीनंतर उपलब्ध वेळ,अनुभव आणि नियोजन कौशल्याचा योग्य वापर करून त्यांनी स्वतःच्या शेतीत आधुनिक व प्रयोगशील शेतीचा अवलंब केला.फुलशेती,भाजीपाला शेती,नियोजनबद्ध उत्पादन आणि बाजारपेठेचा अभ्यास यांचा सुरेख मेळ साधत त्यांनी शेतीमध्ये नवकल्पना राबवल्या.शेतीमध्ये प्रयोगशीलता,आधुनिक तंत्रज्ञान आणि योग्य व्यवस्थापन यांचा उत्तम संगम असू शकतो, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय प्रगतीशील शेतकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

युवा उद्योजक प्रशांत काळबांडे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून कृषी सेवा केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, कृषी सल्ला आणि उत्पन्नवाढी साठी उपयुक्त उपक्रम यांना प्रोत्साहन दिले आहे. शेतकऱ्यांना नव्या संधी उपलब्ध करून देत शेती व्यवसाय अधिक फायदेशीर बनवण्यासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय ठरले आहे.त्यांच्या या योगदानाबद्दल त्यांना राज्यस्तरीय कृषीरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.पुरस्कार स्वरूपात मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन दोघांचा गौरव करण्यात आला. या सन्मानामुळे किनगाव राजा परिसरात समाधान व्यक्त होत असून, त्यांच्या कार्यामुळे तरुण पिढीला शेती व उद्योजकतेकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा मिळत आहे.यावेळी अंकुश पऱ्हाड यांना युवा उद्योजक,गोविंदराव टेके यांना प्रगतशील शेतकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.


# विहिरीत अडकलेले अस्वल, वनविभागाचा थरारक रेस्क्यू

## ज्ञानगंगा अभयारण्यालगतच्या तरोडा रायपूर शिवारात घडलेली घटना, अनेक तासांच्या प्रयत्नांनंतर अस्वल सुरक्षित जंगलात मुक्त

**दैनिक आपला विदर्भ**


**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा तालुक्यात वनविभागाच्या तत्परतेमुळे एका अस्वलाचे प्राण वाचल्याची थरारक घटना समोर आली आहे. ज्ञानगंगा अभयारण्यालगत असलेल्या तरोडा रायपूर शिवारातील एका विहिरीत तीन ते चार वर्षे वयाचे भलेमोठे अस्वल पडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. शिवारातील शेतकऱ्यांना सकाळच्या सुमारास विहिरीतून अस्वलाच्या हालचाली व डरकाळ्या ऐकू आल्यानंतर त्यांनी तातडीने वनविभागाला माहिती दिली.

माहिती मिळताच मोताळा परिक्षेत्रातील वनाधिकारी, कर्मचारी तसेच विशेष रेस्क्यू पथक घटनास्थळी दाखल झाले. खोल विहीर, पाणी आणि भयभीत झालेलं अस्वल यामुळे रेस्क्यू मोहिम अत्यंत आव्हानात्मक ठरली. रेस्क्यू दरम्यान वनविभागाच्या पथकाने विशेष जाळी, दोरखंड, क्रेन आणि संरक्षक साधनांचा वापर केला.



संभाव्य धोके लक्षात घेऊन परिसरात नागरिकांची गर्दी होऊ नये म्हणून बंदोबस्त ठेवण्यात आला. अनेक तासांच्या अथक परिश्रमानंतर अखेर अस्वलाला जाळीत सुरक्षित पकडून हळूहळू विहिरीबाहेर काढण्यात यश आले. अस्वलाला बाहेर काढल्यानंतर वन्यजीव तज्ज्ञांकडून त्याची तात्काळ वैद्यकीय तपासणी करण्यात आली. कोणतीही गंभीर इजा नसल्याचे निष्पन्न झाल्यानंतर आवश्यक उपचार करून अस्वलाला सुरक्षित वाहनातून जंगलात नेण्यात आले. त्यानंतर त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले.

या यशस्वी रेस्क्यूमुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला



असून वनविभागाच्या धाडस, तत्परता आणि वन्यजीव संरक्षणाबाबतच्या भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत आहे. तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी विहिरींना कठडे व संरक्षणात्मक जाळ्या बसवण्याचे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.

# खेलो इंडिया ट्रायबल गेम्स: 13 जानेवारीला राज्यस्तरीय निवड चाचणी

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या निर्देशानुसार छत्तीसगड राज्यामध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या पहिली खेलो इंडिया ट्रायबल गेम्स २०२५-२६ साठी महाराष्ट्र राज्यस्तरीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेअंतर्गत फुटबॉल, हॉकी, आर्चरी, ॲथलेटिक्स, जलतरण, वेटलिफ्टिंग व कुस्ती या खेळांचा समावेश असून ही स्पर्धा खुल्या वयोगटात पार पडणार आहे.

सदर स्पर्धेसाठी राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात येणार असून राज्यस्तरीय निवड चाचणीतून निवड झालेल्या खेळाडू व संघांना राष्ट्रीय निवड चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येणार आहे. राष्ट्रीय निवड चाचणी व स्पर्धेमधून निवड झालेले खेळाडू व संघ पहिल्या खेलो इंडिया ट्रायबल गेम्स २०२५-२६ करीता पात्र ठरणार आहेत.

राज्यस्तरीय निवड चाचणी अंतर्गत दि. १३ जानेवारी २०२६ रोजी विविध ठिकाणी निवड चाचण्या आयोजित करण्यात येणार आहेत. अमरावती येथे आर्चरी, कुस्ती व वेटलिफ्टिंग या खेळ प्रकारांच्या निवड चाचण्या जिल्हा क्रीडा संकुल, तपोवन गेट, अमरावती येथे होणार असून खेळाडूंनी दि. १२ जानेवारी २०२६ रोजी सायं. ६ वाजेपर्यंत विभागीय क्रीडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती येथे उपस्थित राहावे.

हॉकी, ॲथलेटिक्स, जलतरण व फुटबॉल या खेळासाठी दि. १३ जानेवारी २०२६ रोजी निवड होणार असून हॉकी खेळासाठी मुळा एज्युकेशन सोसायटी, यश ॲकेडमी, सोनई, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर येथे निवड चाचणी होणार आहे. ॲथलेटिक्स खेळासाठी दि. पोलिस ग्राऊंड, पालघर, जि. पालघर येथे, जलतरण खेळासाठी श्री. शिवछत्रपती क्रीडा संकुल, महाळुंगे-बालेवाडी, पुणे येथे, आईस हॉकीसाठी स्व. मिनाताई ठाकरे स्केटींग क्रीडा संकुल, निगडी पुणे येथे (संपर्क- सुरेश काकड मो.नं.८८८८८०६१५८) तर फुटबॉल खेळासाठी विभागीय क्रीडा संकुल, मानकापूर, कोराडी रोड, नागपूर येथे निवड चाचणी होणार आहे.

निवड चाचणीसाठी जाणाऱ्या खेळाडूंनी दि. १२ जानेवारी २०२६ पूर्वी संबंधित खेळाच्या संपर्क प्रमुखांशी संपर्क साधून आपली नावे नोंदणी करणे अनिवार्य आहे. राज्यस्तरीय निवड चाचणीकरीता उपस्थित राहणाऱ्या खेळाडूंनी अनुसूचित जमाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्याचे अधिवास (डोमिसाईल) प्रमाणपत्र व आधार कार्ड सोबत आणणे बंधनकारक आहे. तसेच संबंधित खेळ प्रकारासाठी आवश्यक साहित्य व संरक्षक साधने स्वतः आणावीत.

वैयक्तिक खेळ प्रकारांमध्ये आर्चरी खेळासाठी गुणानुक्रमे पहिले ३ खेळाडू, तर कुस्ती व वेटलिफ्टिंग या खेळ प्रकारांमध्ये गुणानुक्रमे पहिले २ खेळाडू राष्ट्रीय स्तरावरील निवड चाचणीसाठी पात्र ठरणार आहेत. सर्व खेळाडूंनी या निवड चाचणीत स्वखर्चाने व स्वतःच्या जोखमीवर सहभागी व्हावे. मात्र, फक्त खेळाडूंसाठी निवास व भोजनाची व्यवस्था कार्यालयामार्फत करण्यात येणार आहे. या निवड चाचणीत सहभागी खेळाडूंना कोणत्याही प्रकारचे सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार नाही. तरी अनुसूचित जमाती () प्रवर्गातील खुल्या वयोगटातील जास्तीत जास्त खेळाडूंनी या राज्यस्तरीय निवड चाचणीत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

## वृत्तविशेष...

# बुलढाण्यात चाचा नेहरु बाल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन; १५ ते १७ जानेवारीदरम्यान विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महिला व बाल विकास विभागाच्या अधिनस्त शासकीय व स्वयंसेवी बाल विकास संस्थांमधील पुनर्वसनासाठी दाखल झालेल्या अनाथ, निराधार व उन्मार्गी बालकांसाठी चाचा नेहरु बाल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव दि. १५ ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत शरद कला महाविद्यालय, हाजी मलंग दर्ग्याजवळ, चिखली रोड, बुलढाणा येथे होणार आहे. महोत्सवाच्या माध्यमातून बालकांमधील सुप्त कलागुणांना वाव देणे, त्यांच्यात बंधुभाव, सांघिक भावना व आत्मविश्वास निर्माण करणे हा मुख्य उद्देश आहे. महोत्सवात विविध सांस्कृतिक, मनोरंजनात्मक कार्यक्रमांसह क्रीडा प्रकारांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून जिल्ह्यातील विविध बाल विकास संस्थांमधील बालके या स्पर्धांमध्ये सहभाग घेणार आहेत. सदर महोत्सवाला जिल्हाधिकारी तसेच विविध विभागांतील व विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे, अशी माहिती महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी दिली आहे.

# राज्य क्रीडा दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणाद्वारे गुरुवार दि.१५ जानेवारी रोजी ऑलिंपिक वीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्म दिवस राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त जिल्ह्यात विविध कार्यक्रम घेतले जाणार असून या उपक्रमास सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर यांनी केले आहे.

दिवंगत खाशाबा जाधव ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा, हेलसिंकी येथे १९५२ मध्ये वैयक्तिक क्रीडा प्रकारातील कुस्तीमध्ये पहिले कास्य पदक पटकावून देशाच्या क्रीडा क्षेत्रात ऐतिहासीक कामगिरी केली आहे. त्यांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरी राज्याचा बहुमान असून नवोदित खेळाडुंना प्रोत्साहन व प्रेरणा देण्याकरीता राज्यभरात त्यांचा जन्मदिवस १५ जानेवारी क्रीडा दिन म्हणुन साजरा केला जातो. या दिवसानिमित्त जिल्ह्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच प्राथमिक व माध्यमिक शाळा, कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालय, एकविध क्रीडा संघटना, क्रीडा मंडळ, क्रीडा केंद्र, स्पोर्ट्स क्लब इत्यादींनी विविध स्पर्धेचे आयोजन व विजेत्यांना पुरस्कार वितरण, शाळेतील राज्यस्तर, राष्ट्रीयस्तर क्रीडापटूंचे गौरव, विद्यार्थ्यांना यशस्वी खेळाडुंबाबत मार्गदर्शन, समुपदेशन, नामवंत खेळाडुसोबत संवाद साधणे आदी कार्यक्रम आयोजित करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सोबतच खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व क्रीडा क्षेत्रातील योगदानावर प्रकाश, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, पालक, क्रीडा प्रेमी नागरीक यांच्यासोबत करीअर संदर्भात परीसंवाद व चर्चासत्र, आपल्या संघटना, क्लब, केंद्रातील खेळाडूंना चर्चासत्र व परीसंवाद, स्पर्धा, उत्कृष्ट खेळाडूंचा गौरव व पुरस्कार देणे याप्रमाणे विविध उपक्रमांचे आयोजन करुन हा दिवस साजरा करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे.

# जिजाऊ गाथा महोत्सवाचे उत्साहात उद्घाटन; सांस्कृतिक कार्य विभागाचे आयोजन



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राजमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग यांच्यावतीने मातृतीर्थ सिंदखेड राजा येथील श्री लखुजीराजे जाधव राजवाडा परिसरात आयोजित 'जिजाऊ गाथा महोत्सव'चे शुक्रवारी उत्साहात उद्घाटन झाले. या उद्घाटन सोहळ्याला आमदार मनोज कायंदे, उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, नगराध्यक्ष सौरभ तायडे, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम, तहसीलदार अजित दिवटे, ॲड. नाझेर काझी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सांस्कृतिक कार्य विभागामार्फत दि. ९ ते १२ जानेवारीदरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमांच्या पहिल्या दिवशी (दि. ९) 'गडगर्जना' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. दि. १० रोजी 'जिजाऊ वंदना महाराष्ट्राची लोकधारा', दि. ११ रोजी महाराष्ट्राच्या लोकवाद्यांचा समावेश असलेला 'वारसा संस्कृतीचा' हा अनोखा संगम, तर दि. १२ रोजी ढोल-ताशा, लाठी-काठी व मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन दिनी सादर झालेल्या 'गडगर्जना' या कार्यक्रमाला जिजाऊ भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.